**नागपूर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २०/०६/२०२० रोजी दुपारी ३.५५ वाजता कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशिमबाग येथे भरलेल्या स्थगित सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त.**

**उपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | **३७** | **क** | **संदीप दिवाकर जोशी** | **महापौर** | |
| २. | **२०** | **ड** | **मनिषा सुनिल कोठे** | **उपमहापौर** | |
| ३. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य | C१८ |
| ४. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या | A७ |
| ५. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या | C२५ |
| ६. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य | C१९ |
| ७. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या | D५ |
| ८. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य | C५ |
| ९. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य | D२२ |
| १०. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य | B१३ |
| ११. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या | A८ |
| १२. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या | C१७ |
| १३. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या | C२१ |
| १४. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य | B१९ |
| १५. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या | C२२ |
| १६. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य | C१३ |
| १७. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या | C२४ |
| १८. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य | C१४ |
| १९. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य | D२८ |
| २०. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या | D३० |
| २१. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या | D३१ |
| २२. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य | D२९ |
| २३. | ७ | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या | D३२ |
| २४. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या | D३३ |
| २५. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य | C६ |
| २६. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या | D८ |
| २७. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या | D१० |
| २८. | ९ | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य | D३५ |
| २९. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या | D३४ |
| ३०. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या | D१२ |
| ३१. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या | D१३ |
| ३२. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या | D१४ |
| ३३. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य | B१ |
| ३४. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या | A६ |
| ३५. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या | C३० |
| ३६. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य | B९ |
| ३७. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या | D१५ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ३८. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य | D२० |
| ३९. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य | B८ |
| ४०. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य | C१५ |
| ४१. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या | C२७ |
| ४२. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या | C२८ |
| ४३. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या | A५ |
| ४४. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या | C२९ |
| ४५. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य | B४० |
| ४६. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य | D१७ |
| ४७. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या | A१ |
| ४८. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य | B३९ |
| ४९. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या | C२६ |
| ५०. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या | A१८ |
| ५१. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य | B११ |
| ५२. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य | C२० |
| ५३. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या | A२१ |
| ५४. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या | A२० |
| ५५. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य | B२० |
| ५६. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या | A१९ |
| ५७. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या | D२ |
| ५८. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य | B२१ |
| ५९. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य | B२ |
| ६०. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या | A२२ |
| ६१. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या | A२३ |
| ६२. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य | D२६ |
| ६३. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य | B१४ |
| ६४. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या | A९ |
| ६५. | १९ | ड | दयाशंकर चंद्रशेखर तिवारी | सदस्य | B३ |
| ६६. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या | A२५ |
| ६७. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या | A१० |
| ६८. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य | D१८ |
| ६९. | २० | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य | A१२ |
| ७०. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य | D२४ |
| ७१. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य | B२२ |
| ७२. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य | B१५ |
| ७३. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या | A२७ |
| ७४. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या | A२८ |
| ७५. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य | B२३ |
| ७६. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या | A११ |
| ७७. | २३ | ब | मनिषा आशिष धावडे | सदस्या | A२९ |
| ७८. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य | B५ |
| ७९. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य | C३ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ८०. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य | B२४ |
| ८१. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या | A१३ |
| ८२. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या | A३ |
| ८३. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य | B१६ |
| ८४. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य | A३० |
| ८५. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य | D१९ |
| ८६. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या | A३१ |
| ८७. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य | B२५ |
| ८८. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य | B२६ |
| ८९. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या | A३२ |
| ९०. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या | B२७ |
| ९१. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य | C८ |
| ९२. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या | A२ |
| ९३. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या | A३३ |
| ९४. | २७ | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य | B१७ |
| ९५. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य | D४ |
| ९६. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या | D३ |
| ९७. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य | B२८ |
| ९८. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य | A३५ |
| ९९. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या | A३६ |
| १००. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य | B२९ |
| १०१. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या | A१४ |
| १०२. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या | B३० |
| १०३. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या | A१५ |
| १०४. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या | A३७ |
| १०५. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य | C१ |
| १०६. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या | A३९ |
| १०७. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य | B७ |
| १०८. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य | B३१ |
| १०९. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या | C३६ |
| ११०. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या | C३७ |
| १११. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य | B१८ |
| ११२. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या | C३८ |
| ११३. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या | C३९ |
| ११४. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या | C४० |
| ११५. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य | D२५ |
| ११६. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य | B३२ |
| ११७. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य | B३३ |
| ११८. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या | C३२ |
| ११९. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य | B३४ |
| १२०. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या | A१६ |
| १२१. | ३५ | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या | C३३ |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १२२. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य | B१२ |
| १२३. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या | C३४ |
| १२४. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या | A१७ |
| १२५. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य | B३५ |
| १२६. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य | B३६ |
| १२७. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य | B३७ |
| १२८. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या | C३५ |
| १२९. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्या | B१ |
| १३०. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य | B३८ |
| १३१. | ३८ | अ | उज्ज्वला वसंतराव बनकर | सदस्या | D६ |
| १३२. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य | C४ |
| १३३. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या | D१६ |
| १३४. | ना.स. | | अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य | C९ |
| १३५. | ना.स. | | पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य | C१० |
| १३६. | ना.स. | | वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य | C११ |
| १३७. | ना.स. | | गांधी निशांत गिरीश | सदस्य | C१२ |
| १३८. | ना.स. | | जिचकार किशोर दामोदर | सदस्य | D९ |

**अनुपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद | आसान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य | D२३ |
| २. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या | D११ |
| ३. | ५ | अ | | | |
| ४. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य | B१० |
| ५. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य | C२ |
| ६. | ८ | ब | | | |
| ७. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य | C७ |
| ८. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या | D७ |
| ९. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्् | D३६ |
| १०. | १० | क | नितिश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य | D२१ |
| ११. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या | A४ |
| १२. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या | A२४ |
| १३. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या | A२६ |
| १४. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या | D१ |
| १५. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या | A३४ |
| १६. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या | A३८ |
| १७. | ३१ | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य | B६ |
| १८. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या | C३१ |

**उपस्थित अधिकारी**

**श्री. राम जोशी अति.आयुक्त**

**डॉ. रंजना लाडे निगम सचिव**

मा.महापौरजी यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

महापौर:- सभा स्थगित होण्यापूर्वी प्रश्न क्र. १९७ श्री. हरीश ग्वालबंशी यांच्या प्रश्नावरती झालेल्या चर्चेत के.टी.नगर येथील कोव्हिड रुग्णालयाचा मुददा उपस्थित झाला असता त्यात असे निदर्शनास आले कि जी इमारत शॉपिंग मॉलसाठी मंजूर करण्यात आली होती. तीच इमारत सभागृहाची परवानगी न घेता आयुक्तांनी कोव्हीड रुग्णालयात परिवर्तीत केली. या पध्दतीने ही बाब स्पष्ट होते की त्या संपुर्ण प्रकरणांमध्ये कुठेतरी गडबड झालेली आहे. त्यामध्ये सन्माननीय स्थायी समिती अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली, बांधकाम समिती अध्यक्ष त्याचप्रमाणे वैद्यकीय व आरोग्य समिती अध्यक्ष, विधी व प्रकल्प समिती सभापती, सन्माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय बसपा गटनेत्या यांची चौकशी समिती नेमण्यात येते. या समितीने तात्काळ ३ दिवसांत २४ तारखेच्या संध्याकाळच्या आत सभागृहाच्या पटलावर चौकशी अहवाल ठेवावा. त्यामध्ये सन्माननीय हरीश ग्वालबंशी, सन्माननीय परिणिता फुके, सन्माननीय आमदार श्री. प्रवीण दटके, त्याचबरोबर ज्यांनी ज्यांनी त्या विषयावर आक्षेप घेतलेले आहे त्या सर्वांना समितीपुढे बोलवावे व त्याचा अहवाल तात्काळ २४ तारखेच्या संध्याकाळपर्यंत सभागृहाच्या पटलावरती ठेवण्यात यावा. या ठिकाणी जी दुर्देवी घटना आज घडली याचे आपण सारे जण साक्षीदार आहोत. आणि जे व्हायला आम्हांला आणि तुम्हांला अपेक्षित नाही ती घटना इतिहासात ही नोंदविली गेली आहे. सभागृहातील कोणत्याही मा.सदस्यांचा मानस हा सन्माननीय आयुक्तांचा अपमान व्हावा अशा पध्दतीचा मुळीच नाही. परंतु सभागृहात प्रत्येक वेळी मला बोलू दिले पाहिजे अशी त्यांची धारणा असते. माझ्या बोलण्यामध्ये कुणी बोलू नये ही देखील त्यांची धारणा असते आणि त्यामुळे ते या ठिकाणी निघुन गेलेत. मी अतिरिक्त आयुक्त यांना म्हटले होते की त्यांनी त्यांच्याशी संवाद साधावा. त्यांनी फोनवरुन संवाद साधलेला आहे. त्यांचे काय बोलणे झाले आहे ते त्यांनी सभागृहामध्ये सांगावे.

अति.आयुक्त(श्री.राम जोशी):-सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. सभागृहाच्या निर्देशाप्रमाणे मी आयुक्तांशी फोनवरुन चर्चा केली, त्यांना विनंती केली की सभागृहाने निर्देश दिले आहे की आपल्याशी चर्चा करुन, विनंती करुन आपणांस सभागृहात येण्यासाठी विनंती केली आहे. ते म्हणालेत ज्या सभागृहात आयुक्तांचा मान राखला जात नाही त्या सभागृहात मला यायचे नाही.

महापौर:- अति.आयुक्त यांचे बोलणे झाल्यानंतर मी सभागृहात जसे सांगितले होते. तसे मी देखील स्व:त त्यांना विनंती केली. त्यांना मी देखील सांगितले की आपण सदस्यांचे बोलणे मनावर घेवू नये. परंतु ते कोणत्याही स्थितीत ऐकण्याच्या मनस्थितीत नाही. त्यांनी स्पष्ट सांगितले की माझा अपमान झाला आणि ज्या ठिकाणी माझा अपमान होणार असेल त्या ठिकाणी मी सभागृहात येणार नाही. सन्माननीय आयुक्त आल्यापासून पदाधिका-यांनी त्यांच्याशी जुळवून घेण्याचा प्रयत्न केला, विरोधी पक्ष नेत्यांनी देखील जुळवून घेण्याचा प्रयत्न केला. आपण अनेकांनी त्यांना वेळ मागितली ती वेळ देखील मिळाली नाही. आपल्या जेष्ठ सदस्यांना तीन-तीन तास त्यांच्या कक्षेच्या बाहेर दुर्दैवाने उभे राहावे लागले. यापैकी कोणताही मा.सदस्य आपले वैयक्तिक काम घेवून त्यांच्या पर्यंत गेले नव्हते. त्यामुळे ज्या पध्दतीची वर्तवणुक सन्माननीय आयुकतांनी या ठिकाणी दाखविली ती अत्यंत दुखद आणि निषेधार्थ आहे. या ठिकाणी हे सभागृह त्यांच्या प्रति या सभागृहातील त्यांच्या वर्तणुकीच्या प्रति तीव्र नाराजी व्यक्त करते. अति. आयुक्तांनी त्यांना विनंती केली, आपल्या सर्वांचा प्रतिनिधी या नात्याने मी देखील विनंती केली, तरी या सभागृहाच्या माध्यमातून मला पुन्हा एकदा विनंती करावयाची आहे. लोकप्रतिनिधी हा जनतेचा खरा प्रतिनिधी आहेत त्यामुळे संवाद साधण्याच्या दृष्टीने, सामोर जाण्याच्या दृष्टीने, शहराच्या विकासाच्या दृष्टीने, शहरातील जनतेच्या प्रश्नाच्या दृष्टीने सभागृहाच्या वतीने पुन्हा एकदा विनंती करतो. त्यांनी या सभागृहात यावे, त्यांना जे वाटते ते मांडण्याची संधी

देखील या सभागृहात दिली जाईल. जेणेकरुन त्यांनी, प्रशासकीय अधिका-यांनी, नगरसेवकांनी, आपण सा-यांनी मिळून या शहराच्या विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न करावा या दृष्टीकोनातून त्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी आपला राग बाजूला ठेवून पुन्हा एकदा सभागृहात यावे आणि त्यापर्यंत मंगळवारी सकाळी ११ वाजेपर्यंत सभा स्थगित करण्यात येते.

श्री.संदीप जाधव:- मा.महापौरजी, काही जेष्ठ सदस्यांनी स्थगण प्रस्ताव दिलेला आहे.

महापौर:- स्थगण प्रस्तावाचे वाचन करण्यात यावे.

निगम सचिव:- (वाचले)

**<u>स्थगण प्रस्ताव</u>**

प्रति,

मा.महापौरजी,

म.न.पा.नागपूर

विषय:- मा. आयुक्त यांच्या कार्यक्षैलीबद्दल मनपा सभागृहात मनपा सर्वसाधारण सभा दि.२०/०६/२०२० मध्ये स्थगण प्रस्ताव ठेवण्याबाबत.

महोदय,

माझ्या प्रभागात सन २०२९-२० या वर्षात स्थायी समितीने ज्या कामांना मंजुरी दिली होती. त्यापैकी खालील कामांना मनपा आयुक्तांनी स्थगिती दिली आहे.

१) कामगार नगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण
२) रमणा मारोती नगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण
३) साईबाबा नगर येथिल पावसाळी नाली व सिमेंट रस्त्यांचे बांधकाम
४) गोपाळकृष्ण लेआऊट येथीलसिवर लाईनचे बांधकाम

महोदय,

या कामांना मंजुरी देण्यापूर्वी माझ्या प्रभागाचे कनिष्ठ अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी मौक्याची पाहणी करुन आवश्यकता तपासून या कामांना मंजूरी दिली व ठेक्याच्या सर्व कार्यप्रणालीचे पालन करुन कार्यदेश झाला. ही अत्यावश्यक कामे आहेत यातील क्रमांक ३ चे काम थांबविल्यामुळे कालच्या पावसात संपुर्ण घरामध्ये पानी गेले. मी महिला नगरसेविका असून मला मनपा आयुक्तांच्या या स्थगिती निर्णयामुळे खुप मानसिक त्रास होत आहे. प्रभागातील लोक माझ्या घरावर मोर्चे घेवून येतात.

मी आयुक्तांशी संपर्क केला असता ते आम्हांला भेट देत नाही. त्यांच्या स्विय सहा.या बाबतीत हतबल दिसतो. अभियंते, उप आयुक्त, विभाग प्रमुखांना माझी बाजू कळत असून ते मुग गिळून गप्प आहेत. सध्या कोरोना मुळे नागरिक सतर्क आहेत त्यामुळे माझ्या सारख्या शिवसेनेच्या प्रतिनिधीला जनतेचे बोलणे सहन करावे लागते.

आपण महापौर म्हणून यामध्ये हस्तक्षेप करावा अशी माझी विनंती आहे. या विकास कामाच्या प्रति आयुक्तांची असलेली उदासिनता लोकप्रतिनिधींना भेट न देण्याची मानसिकता, लोकप्रतिनिधींची सर्वसामान्य लोकांसमोर बेइज्जत करावयाची कृती, माझ्या प्रभागातील लोकांसमोर मी किती अकार्यक्षम आहे हे दाखविण्याची त्यांची प्रवृत्ती व महाराष्ट्र शासनाला ते किती कार्यक्षम ही दाखविण्याची त्यांची खुबी या सर्व बाबीं एक लोकप्रतिनिधी म्हणून माझ्या करिता गंभीर आहेत, मला क्लेषदायक आहेत.

तरी महोदय, या बाबींवर मनपाच्या सभागृहात चर्चा व्हावी अशी माझी विनंती आहे. त्यासाठी हा स्थगण प्रस्ताव आहे.

कृपया योग्य कार्यवाही करावी.

श्रीमती मंगला गवरे
नगरसेविका प्रभाग २८,

**दुसरा स्थगण प्रस्ताव** (वाचले)

प्रति,
मा.श्री.संदीप जोशी
महापौर, मनपा,
नागपूर.
महोदय,

कोव्हीड-१९ च्या नावाखाली निर्वाचित जनप्रतिनिधींना संपविण्याच्या दृष्टीने मा. आयुक्त श्री.तुकाराम मुंढे यांनी कोणत्याही जनप्रतिनिधींना विश्वासात न घेता संपुर्ण प्रक्रिया चालविण्याचा प्रयत्न केला. पॉझिटिव्ह पेशंटची बाब असो, किंवा लोकांना कोरनटाईन करण्याचे विषय असो. अथवा परिसराला प्रतिबंधीत किंवा रेड झोन घोषीत करण्याचा विषय असो. कोणत्याही विषयात कधीही विचारण्यात आलेले नाही. शुल्लक सॅनीटायझरचा विषय असो किंवा गर्भवती महिलांची कोव्हीड चाचणीचा विषय असो. याची सुध्दा माहिती देण्यात आलेली नाही. हा सर्व अपमान झेलून सुध्दा नगरसेवक जनहिताच्या कामात गुंतलेले होते. प्रशासनाला नगरसेवकांची जनहिताची बाब पटली नसून त्यांचे सेवाकार्यात अडथळा आणण्याचे काम, प्रतिबंधीत क्षेत्रात(कंटोनमेंट) झोनच्या नावाखाली केले. जेव्हा अवैधानिक रित्या मॉस्क, कोरनटाईन विषय सुरु झाला आणि जनप्रतिनिधींनी प्रश्न उभा केला त्याच्या विरोधात पोलिसात तक्रार करुन गुन्हे नोंदविण्याचे काम सुध्दा आयुक्त तुकाराम मुंढे यांनी केली. याशिवाय प्रभागातील विकास कामे, पावसाळयापूर्वीचे कामे, धोकादायक उघडया चेंबरचे कामे, लो लाईन एरियामध्ये पानी साठण्याचे कामे, लहान लहान गडडे बुजविण्याचे कामे ही सर्व कामे आयुक्तांनी बंद करुन ठेवली आहे. एकीकडे आयुक्ताकडे ॲपवर तक्रार केली असता त्वरित कार्यवाही होते. दुसरीकडे जनप्रतिनिधींने सांगितलेली कामे होत नाही. प्रशासनाने सुड बुध्दीने तयार करण्यात आलेले हे नियोजन निर्वाचित जनप्रतिनिधींना राजकीय दृष्टया संपविण्याचे षडयंत्र आहे. प्रशासनाने रचलेल्या या करारावर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी हा स्थगण प्रस्ताव सभागृहाच्या पटलावर चर्चेसाठी ठेवून चर्चेनंतर निर्णय घ्यावा ही विनंती

नितीन साठवणे
प्रभाग क्र. २१ ब

**तिसरा स्थगण प्रस्ताव** (वाचले)

प्रति,
मा.श्री.संदीप जोशी
महापौर, मनपा,
नागपूर
विषय:- मा. आयुक्त यांचेवर सभागृहात अविश्वास प्रस्ताव मांडण्याबाबत
महोदय,

कोवीड-१९ (कोरोना) या रोगाची साथ जेव्हा नागपूरात सुरु झाली तेव्हा मा.आयुक्त, नागपूर महानगर पालिका यांचे आदेशाचे अनेक ठिकाणी कोरोन्टाईन प्रक्रिया राबविण्यात आली तसेच प्रभागातील एरियामध्ये

कोवीड रुग्णा आढळल्यामुळे सिल करण्यात आलेत. या सिल केलेल्या एरियामध्ये नागरीकांना आवश्यक मुलभूत सोयी सुविधा मिळत नसल्याबाबतच्या तक्रारी त्यांनी स्थानिक नगरसेवक श्री. नितीन साठवणे यांना सांगून समस्या सोडविण्यासाठी काही उपाययोजना करण्याबाबत विनंती केली होती तेव्हा श्री.साठवणे यांनी त्यांच्या प्रभागातील कोरोन्टाईन परिसरातील नागरीकांच्या समस्या सोडविण्यासाठी मा.आयुक्त यांच्याकडे पाठपुरावा केला व त्यांना काही सुचना केल्यात परंतु त्यांच्या समस्यांचे निदान न करता उलट नगरसेवक श्री. नितीन साठवणे यांचे विरोधात कोणतेही कारण नसतांना गुन्हा दाखल केला. त्यामुळे सतरंजीपुरा परिसरातील नागरीक व जनप्रतिनिधी मध्ये मा.आयुक्त यांचे विरोधात असंतोषाचे वातावरण आहे.

करिता वरील बाबींचा विचार करता मा.आयुक्त, मनपा, नागपूर यांचे विरोधात श्री.नितीन साठवणे, यांचे वर गुन्हा दाखल केल्याने सभागृहात अविश्वास ठराव मांडण्यात यावा, ही विनंती

आपला

संजय महाकाळकर

महापौर:- या ठिकाणी तीन स्थगण प्रस्ताव आलेले आहे. तीन प्रस्तावापैकी तिसरा जो प्रस्ताव आहे सन्माननीय संजय महाकाळकर यांचा, तो मी या ठिकाणी फेटाळीत आहे तो स्विकारत नाही. उर्वरित दोन प्रस्तावावर मंगळवारी सकाळी ११.०० वाजता आपण चर्चा करु.

श्री.प्रविण दटके:-मा.महापौरजी, त्या दिवशी आपण दोन्ही स्थगण प्रस्ताव स्विकारले होते. आपण त्या ठिकाणी म्हटले होते की दोन्ही एकाच मायनाचे प्रस्ताव आहेत. माझी विनंती आहे हे संभाषण सुरु होण्याच्या आधी आयुक्त सभेला येत असतील तर .....

श्री. प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, एका पेक्षा जास्त प्रस्ताव मांडता कामा नये. मागच्या वेळेचा विषय एकच होता परंतु येथे दोन वेगवेगळे विषय आहेत. त्यामुळे दोन पैकी एक कोणता स्थगण प्रस्ताव आपण स्विकारणार आहे ही भुमिका आपण येथे सांगितली पाहिजे.

महापौर:- मंगळवार सकाळी ११ वाजेपर्यंत ही सभा स्थगित करु या त्या सभेमध्ये या सर्व बाबींवर निर्णय घेण्यात येईल

श्री.नितीन साठवणे:- मा.महापौरजी, या संलग्न विषयामध्ये मंगला गवरे ताई यांच्या विषयामध्ये विकास कामे थांबल्याच्या संदर्भात माझा सुध्दा विषय आहे तो सुध्दा समाविष्ठ करण्यात यावा.

महापौर:- मंगळवारी सकाळी ११ वाजेपर्यंत ही सभा स्थगित करण्यात येते. पुन्हा एकदा अति. आयुक्त यांना हे सभागृह सुचना करते त्यांनी सन्माननीय आयुक्तांशी एकदा बोलावे आणि त्यांना विनंती करावी त्यांनी या सभागृहात मंगळवारी सकाळी ११ वाजता या ठिकाणी यावे तोपर्यंत ही सभा मंगळवारी ११ वाजेपर्यंत स्थगित करण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| हस्ता /— डॉ.रंजना लाडे<br>**निगम सचिव**<br>**महानगरपालिका, नागपूर** | | हस्ता /— संदीप जोशी<br>**महापौर**<br>**महानगरपालिका, नागपूर** |